Maharashtra times

Article dated 11/12/16

Moneta event description article

# पोदारचा 'मॉनेटा' मालामाल

**अमेय मालशे, आदेश पुरंदरे,**
**कॉलेज क्लब रिपोर्टर**



मुंबई : माटुंगा येथील रा. आ. पोदार कॉलेजचा फायनान्स फेस्ट मॉनेटाला दणक्यात सुरुवात झाली आहे. स्टार्ट-अपच्या युगात कर भरण्यापासून ते शेअर बाजारचे फंडे जाणून घेण्यापर्यंतच्या अनेक गोष्टींची सखोल माहिती या फेस्टिव्हलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. 'मॉनेटा २०१६: स्टार्ट-अप शोडाऊन' ही यंदाची थीम असून, 'महाराष्ट्र टाइम्स' या फेस्टचा मीडिया पार्टनर आहे.

पोदारच्या कॅम्पसमध्ये रंगत असलेल्या या फेस्टिव्हलला दोन दिवसांपासून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. 'मॉनेटा'च्या निमित्ताने आयोजित सेमिनार्स, क्विझेस आणि लेक्चर्स सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. पोदारचा हा दरवर्षीप्रमाणेच हटके आणि वेगळेपणा जपणारा, शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त आणि आर्थिक ज्ञानाच्या बाबतीत मालामाल करणारा ठरणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पोदारच्या 'मॉनेटा'मध्ये दिग्गजांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शेवटच्या दिवशी डॉ. नारायण मूर्ती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांचा अर्थकारणाचा अनुभव आणि कारकिर्दीतील गंमतीजमती जाणून घेण्याची ही उत्तम संधी आहे.